PM SHRI
Pradhan Mantri ScHools for Rising India
Creating holistic and well-rounded individuals equipped with key 21st Century skills

शिक्षा मंत्रालय
भारत सरकार
सत्यमेव जयते

राष्ट्रीय शैक्षिक योजना एवं प्रशासन संस्थान
NATIONAL INSTITUTE OF EDUCATIONAL PLANNING AND ADMINISTRATION

उदयोन्मुख भारतातील

# PM SHRI शाळांकरिता

# शालेय नेतृत्व विकास



द्वारा अनुवादित

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


१)	PM SHRI : शालेय नेतृत्व

२)	शालेय नेतृत्व : प्रमुख संकल्पना

३)	शालेय नेतृत्वाची व्याख्या

४)	PM SHRI शालेय नेतृत्वाची भूमिका आणि जबाबदाऱ्या निश्चिती

५)	शालेय नेतृत्व व क्षमता विकास : एक आवश्यक दुवा

६)	क्षमता विकास : मूल्यांकन सारणी

७)	शालेय नेतृत्व म्हणून या क्षमता कशा विकसित कराल?

८)	चर्चा करूया : काही महत्त्वाच्या क्षमतांची

९-१०)	विकासाची मानसिकता, कृती

११)	धैर्यशीलता

१२)	अध्ययनसंदर्भात शालेय नेतृत्वाचा आदर्श नमुना

१३)	अध्यापनशास्त्रीय नेतृत्व

१४)	शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी धोरणे

१५-१६)	सामान्य अध्यापनशास्त्र अंमलबजावणीची नेतृत्व कृती
शाळांमध्ये शिक्षक संस्कृती विकसित करणे.

१७)	शालेय नेतृत्व सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास साधण्यासाठी नेतृत्व दिशा

१८)	शालेय नेतृत्व विकास : सात अभ्यासक्रम क्षेत्रे

१९)	संदर्भ

# PM SHRI शालेय नेतृत्व

PM SHRI शालेय नेतृत्व सर्वांना उच्च दर्जाचे म्हणजे **न्याय्य, समावेशक आणि आनंदी शिक्षण** देण्यासाठी प्रतिबद्ध आहे, ज्यांत, मुलांच्या वैविध्यपूर्ण अध्ययन गरजांची पूर्तता करून, त्यांच्यातील अद्वितीय क्षमता संवर्धन यावर लक्ष केंद्रित करते.

## PM SHRI शाळांमध्ये परिपूर्ण शाळा विकासासाठी सर्वसमावेशक क्षेत्रे :

१) प्रारंभिक बाल्यावस्थेतील काळजी व शिक्षण

२) लिंगसमभाव आणि समता

३) एकविसाव्या शतकातील कौशल्याधारित शिक्षण

४) प्रवेश आणि टिकवणूक

५) पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान

६) शिक्षक शिक्षण सक्षमीकरण

७) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व पात्रता

८) गुणवत्ता आणि नावीन्यता

९) समावेशित शिक्षण

१०) व्यावसायिक शिक्षण

११) पर्यावरणासाठी जीवनशैली

# शालेय नेतृत्व : प्रमुख संकल्पना

PM SHRI शाळेच्या परिणामकारक आणि प्रभावशाली शालेय नेतृत्वास उपयोजनांवर आधारित अनेकविध महत्त्वाच्या संकल्पनांबाबत पारंगतता प्राप्त करणे आवश्यक आहे. जसे की,

- क्षमता
- अध्यापनशास्त्रविषयक
- सहयोग
- संवाद कौशल्ये
- व्यावसायिक विकास
- नेतृत्व
- मानसिकता
- अध्ययन संस्कृती

**उतारा : ५.१६**

शाळेचे मुख्याध्यापक आणि शाळेच्या संकुलाचे प्रमुख यांना आपले नेतृत्वगुण व व्यवस्थापन कौशल्यांमध्ये सतत सुधारणा करण्यासाठी समान मोड्यूलर नेतृत्व/व्यवस्थापन कार्यशाळा, ऑनलाइन विकासाच्या संधी आणि व्यासपीठ उपलब्ध असेल, जेणेकरून त्यांना देखील आपल्या चांगल्या प्रथा/पद्धतींविषयी एकमेकांना सांगता येईल. अशा प्रमुखांनी दरवर्षी मोड्यूल्समध्ये ५० किंवा त्याहून अधिक तास सहभागी होणे अपेक्षित आहे. यामध्ये, नेतृत्वगुण आणि व्यवस्थापनाबरोबरच आशय आणि अध्यापनशास्त्राशी संबंधित कार्यक्रमांचा देखील समावेश असेल, तसेच क्षमतेवर आधारित शिक्षण या विचाराचा आधार घेऊन अध्यापनशास्त्रीय योजना तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यावर भर दिला जाईल.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०.**

# शालेय नेतृत्वाची व्याख्या

''नेतृत्व ही स्वतःमध्ये, शाळेच्या इतर भागधारकांमध्ये आणि शाळेच्या विद्यमान परिस्थितीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रभावांचा वापर करण्याची प्रक्रिया होय.'' ही कल्पना प्रत्यक्ष कृतीत आणण्यापूर्वी ती समजून घेण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा व व्हिडिओ पाहा.

https://www.youtube.com/watch?v=c9L3ReT7UuQ



**व्हिडिओवर आधारित परामर्षी प्रश्न :**

१) व्हिडिओ बघताना तुम्हांला काय वाटले?

२) एखाद्या उपक्रमाचे नेतृत्व करण्यासाठी 'कृती' महत्त्वाची निर्धारक कशी आहे?

३) शाळेच्या नेतृत्वाचा सराव/अंमलबजावणी करण्यासाठी या व्हिडिओमधून तुम्ही कोणते निष्कर्ष काढाल?

४) तुमच्या मते सहयोगी नेतृत्व म्हणजे काय?



**उपक्रम**

आपल्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक अनुभवांवर आधारित शालेय नेतृत्व स्पष्ट करा.

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

महत्त्वपूर्ण संदेश : PM SHRI शाळेचे नेतृत्व करीत असताना, प्राधिकृत पदावरील नेतृत्वासोबतच कृतीतून नेतृत्व करणारा नेता असणेही आवश्यक आहे.

# PM SHRI शालेय नेतृत्वाची भूमिका आणि जबाबदाऱ्या निश्चिती

## प्रशासन

- नियम आणि नियमावलीचे पालन.
- विद्यार्थी प्रवेश आणि सहभाग यासाठी न्याय्य धोरणे ठरविणे.
- नस्ती आणि अभिलेखे यांची देखभाल.
- आर्थिक प्रशासन
- नियमांना बांधील राहून नियोजन आणि अंमलबजावणी
- सर्व भागधारकांसोबत महत्त्वाच्या माहितीचे सामायिकीकरण.

## व्यवस्थापन

- कार्ये आणि दैनंदिन प्रक्रिया यांचे व्यवस्थापन.
- संसाधनांचे वाटप आणि महत्तम उपयोग.
- भागधारक यांचेसोबत संप्रेषण संवाद माध्यमाबाबतची खात्री
- संघव्यवस्थापन
- बालमेळा, रोजगार मेळा, वार्षिक क्रीडा दिवस, सत्कार समारंभ, हरित प्रदर्शन, विज्ञान मेळा यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन.

## नेतृत्व

- प्रकाशझोतासारखी दूरदृष्टी.
- सहकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि समुदाय यांना प्रेरित करणे.
- सर्व भागधारकांच्या सहयोगितेची अपेक्षा.
- स्वत: तसेच शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास साधणे.
- अध्यापनशास्त्रीय प्रक्रिया व नावीन्यतेचे नेतृत्व.
- शैक्षणिक पर्यवेक्षण.
- प्रगतीचे पुनरावलोकन आणि अनुरूप सुधारणा करणे.
- सर्वसमावेशक सुधारणांसाठी शाळा नेतृत्व.

> **प्रभावी नेतृत्व म्हणजे प्राधान्यांच्या गोष्टी प्रथम करणे.**
> **प्रभावी नेतृत्व म्हणजे शिस्त व शिस्तपालन.**
>
> **- स्टीफन कोवे**

# शालेय नेतृत्व व क्षमता विकास : एक आवश्यक दुवा

०१

शालेय नेतृत्वाने विविध भूमिका व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी सराव-परामर्ष आणि कृतीच्या प्रगतशील मार्गावरील एक अनुभवी व ज्येष्ठ अभ्यासक म्हणून विविध क्षमतांचा विकास करणे आवश्यक आहे.

०२

एखाद्या विशिष्ट क्षेत्राशी निगडित आवश्यक ज्ञान, कौशल्ये, दृष्टिकोन, वर्तन आणि मूल्ये इत्यादींचे संयोजन म्हणजे क्षमता होय.

०३

शालेय नेतृत्वाने आपल्या व्यावसायिक प्रगतीपथावर बहुविध क्षमता विकसित करणे आवश्यक आहे.

०४

शालेय नेतृत्व शाळा संरचना आणि सकारात्मक बदलाच्या प्रक्रिया इत्यादींना प्रभावित करण्यासाठी क्षमता प्रदर्शित करते.

०५

शालेय नेतृत्वाने आपल्या वर्तन आणि कृतींतून दर्शविलेल्या नेतृत्व क्षमता या शिक्षकांचे व्यावसायिक विकास आणि विद्यार्थ्यांचे शिकणे सकारात्मकदृष्ट्या प्रभावित करतात.

०६

शालेय संस्कृती, जी विद्यार्थी आणि प्रौढ दोघांमध्ये उच्च दर्जाच्या ज्ञानाचे आदानप्रदान, कौशल्यविकास, विद्यार्थ्यांचे कल्याण व सुधारणा आणि अध्ययन निष्पत्तींची वृद्धी यात योगदान देते.

> **"पदावर काम करणे म्हणजे नेतृत्व नाही. आपल्या आखत्यारीत असलेल्यांची जबाबदारी घेणे म्हणजे नेतृत्व."**
>
> **सीमोन सिनेक**

# क्षमता विकास : मूल्यांकन सारणी

शालेय नेतृत्व म्हणून विविध क्षमतांमध्ये आपले स्थान कुठे आहे? याचे मूल्यमापन करण्यास ही मूल्यांकन सारणी मदत करू शकेल. योग्य स्तंभामध्ये खूण करा आणि आपण सद्यःस्थितीत कुठे आहोत, हे पाहा व आपल्या क्षमता सुधारण्याच्या दिशेने काम करा. सर्वांत कमी (१) आणि सर्वोत्तम (५) असे गुणदान करा.

| मुख्य क्षमता | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| शारीरिक व मानसिक | | | | | |
| सामाजिक व भावनिक | | | | | |
| परामर्ष/चिंतन | | | | | |
| संप्रेषण/संभाषण | | | | | |
| विकासाची मानसिकता | | | | | |
| धैर्यशीलता | | | | | |
| इतरांना प्रेरित करणे | | | | | |
| सहयोग | | | | | |
| प्रशिक्षण | | | | | |
| सदुपदेशन | | | | | |
| प्रात्यक्षिक | | | | | |
| प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व | | | | | |
| प्राधान्यक्रम/प्राधान्यता | | | | | |
| लवचीकता | | | | | |
| बहुकौशल्ये | | | | | |
| पर्यवेक्षण | | | | | |
| समुपदेशन | | | | | |
| संघर्ष निराकरण | | | | | |
| संगणकीय पारंगतता | | | | | |
| समस्या निराकरण | | | | | |
| नावीन्यता | | | | | |
| निर्णय क्षमता | | | | | |
| आनंदीवृत्ती | | | | | |

**“स्वप्नांना सत्यात उतरविण्याची क्षमता म्हणजे नेतृत्व.”**

**वॉरेन जी. बेनीस**

# शालेय नेतृत्व म्हणून या क्षमता कशा विकसित कराल?

विचार करा आणि धोरणास प्रतिसाद द्या.

| मुख्य क्षमता | या क्षमता मी स्वतःमध्ये कशा प्रकारे विकसित करू शकतो? | शिक्षक नेतृत्व व्यावसायिक दृष्टिकोनातून विकसित करण्यासाठी मी शिक्षकांना कोणत्या संधी उपलब्ध करून देऊ शकतो? | विद्यार्थी नेतृत्व विकसित होण्यासाठी व त्यांना अध्ययन व विकासात व्यस्त ठेवण्यासाठी मी कोणत्या संधी निर्माण करू शकतो? |
|---|---|---|---|
| शारीरिक व मानसिक | | | |
| सामाजिक व भावनिक | | | |
| परामर्ष/चिंतन | | | |
| संप्रेषण/संभाषण | | | |
| विकासाची मानसिकता | | | |
| धैर्यशीलता | | | |
| इतरांना प्रेरित करणे | | | |
| सहयोग | | | |
| प्रशिक्षण | | | |
| सदुपदेशन | | | |
| प्रात्यक्षिक | | | |
| प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व | | | |
| प्राधान्यक्रम/प्राधान्यता | | | |
| लवचीकता | | | |
| बहुकौशल्ये | | | |
| पर्यवेक्षण | | | |
| समुपदेशन | | | |
| संघर्ष निराकरण | | | |
| संगणकीय पारंगतता | | | |
| समस्या निराकरण | | | |
| नावीन्यता | | | |
| निर्णय क्षमता | | | |
| आनंदीवृत्ती | | | |

"नेतृत्व ही सर्वोच्च कला आहे; कारण ती इतर कला आणि व्यवसायांना क्रियाशील करण्यासाठी उद्युक्त करते."

स्टीफन कोवे

# चर्चा करूया काही महत्त्वाच्या क्षमतांची

**आनंदीवृत्ती**
प्रतिकूल परिस्थितीत अपयशाला यशस्वीपणे हाताळत सकारात्मकता, धैर्य आणि स्वास्थ्य कायम ठेवण्याची क्षमता.

**प्रात्यक्षिक**
मानवी क्षमता निर्मितीच्या हेतूने विशिष्ट वर्तन, कृती किंवा विश्वासाचे व्यावहारिक प्रदर्शन.

**मानसिकता**
एक विश्वास, जो स्वत:ची तसेच सभोवतालच्या विश्वाची जाणीव करून देतो.

**धैर्यशीलता**
विविध अडथळ्यांचा सामना करून देखील ध्येयाप्रति उत्कट असणे आणि त्याच्या प्राप्तीसाठी दीर्घ काळ चिकाटी दर्शविणारी क्षमता.


**संप्रेषण/संभाषण**
सक्रिय श्रवणपद्धती, लेखीपद्धती तसेच शाब्दिक व अशाब्दिक माध्यमांतून संवाद करणे आणि स्वत:स अभिव्यक्त होण्याची

**अनुकूलता**
कठीण परिस्थितीला संधीमध्ये बदलण्याची सक्षमता, समायोजित होण्यासाठी बदलाची इच्छा.



# विकासाची मानसिकता

डॉ. कॅरोल एस. ड्वेक, यांच्या **'वैयक्तिक कामगिरी आणि शिकण्याचा दृष्टिकोन'** या वरील मानसिकतेचा प्रभाव या उत्कृष्ट संशोधनाने एक रंजक सत्य समोर आणले. त्यांचा अभ्यास, एक प्रौढ किंवा विद्यार्थी यांची कामगिरी आणि यश हे आंतरिक क्षमतेवर कशा प्रकारे निश्चित परिणाम करत असेल, यावर केंद्रित आहे. अध्ययन हे ध्येय ठेवून प्रौढ किंवा विद्यार्थी अधिकाधिक शिकण्यासाठी असलेले रंजक आणि आव्हानात्मक कार्य हाती घेतो आणि आश्चर्यकारकरीत्या जीवन तसेच शिक्षणातील अपयशांवर मात करतो.




Source: https://www.mindsetworks.com/science/Impact

# कृती

खाली दिलेली वाक्ये पाहा. ही **निश्चित मानसिकता** व **विकासाची मानसिकता** स्पष्ट करतात. या विधानांचे काळजीपूर्वक वाचन करून, त्याचे निश्चित मानसिकता व विकासाची मानसिकता या गटानुसार वर्गीकरण करा.

१) बुद्‌धिमत्ता व सर्जनशीलता स्थिर/अचल असतात.
२) मदत किंवा मार्गदर्शन घेणे म्हणजे, कमी बुद्‌धिमत्तेचे लक्षण आहे.
३) मुलांना प्रज्ञावंत किंवा गतिमंद असे संबोधने.
४) आव्हानात्मक कार्यासोबत आनंद असतो.
५) आव्हानांमुळे प्रगती होते.
६) अपयशाकडे वाढीची संधी म्हणून पाहा.
७) आपल्याला काहीच येत नाही, अशी सतत भावना असणे.
८) प्रयत्नांनंतर आंतरिक क्षमता वाढवता येते, तसेच सन्मानित केली जाते.
९) शिकण्याची तीव्र इच्छा असणे.
१०) आव्हानांना संधी म्हणून स्वीकारणे.
११) श्रेष्ठता सिद्‌ध करणे म्हणजे यश.
१२) बुद्‌धिमान/चाणाक्ष व्यक्ती (प्रौढ/मुले) कधी चुका करत नाहीत.
१३) मेहनती व्यक्ती (प्रौढ/मुले) जास्त काळ यशस्वी असतात.
१४) प्रयत्न हे जतन केलेले मूल्य आहे.
१५) अविरतपणे केलेले श्रम म्हणजे यश होय.
१६) खरी क्षमता स्थिर/अचल असते.
१७) धोक्याची भीती.
१८) अवगत क्षमतांची मान्यता घेणे.
१९) खरी क्षमताही प्रचंड इच्छा, परिश्रम व चिकाटी यांतूनच वृद्‌धिंगत केली जाऊ शकते.
२०) अपयश म्हणजे अंत.

| निश्चित मानसिकता | विकासाची मानसिकता |
|---|---|
| .................................... | .................................... |
| .................................... | .................................... |
| .................................... | .................................... |
| .................................... | .................................... |
| .................................... | .................................... |
| .................................... | .................................... |
| .................................... | .................................... |
| .................................... | .................................... |

“ प्रशंसा ही मुलाच्या व्यक्तिमत्त्वाच्या गुणवैशिष्ट्यांवर न करता त्याच्या प्रयत्नांवर व कर्तृत्वावर केली पाहिजे. ”

– करोल एस. ड्वेक

मुख्य संदेश :
PM SHRI शालेय नेतृत्व म्हणून आपण आपल्या कृतीने आणि पदाने नेतृत्व केले पाहिजे.

# धैर्यशीलता

**डॉ. अँजेला ली डकवर्थ** यांनी या ‘TED talk’ मध्ये धैर्यशीलता क्षमता शोधली आहे. व्हिडिओ पाहा आणि अनुमान काढा.



**स्रोत :** https://www.youtube.com/watch?v=H14bBuluwB8

**चिंतनशील प्रश्न :**

१) विद्यार्थ्यांच्या यशाचे निर्धारक काय आहेत?

२) शिक्षकांना कोणती गोष्ट प्रेरित ठेवते?

३) माझ्या शाळेत मी, शिक्षक आणि विद्यार्थी यांचेसाठी भरीव कार्यनीती कशी उभारू शकतो?

४) विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीवर कशाचा प्रभाव होतो?

**शाळाप्रमुखांसाठी सूचना :**

- कृती/कार्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या आंतरिक प्रेरणेसाठी कोणती धोरणे असावी, यावर शिक्षक आणि विद्यार्थी यांचेसोबत चर्चा करा.
- यश मिळविण्यासाठी फक्त जन्मजात बुद्धिमत्ताच महत्त्वाची नसून धैर्यशीलता, तीव्र इच्छाशक्ती आणि चिकाटीही आवश्यक आहे. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये या मूल्यांचा अंतर्भाव करा.
- नवीन आव्हानांमुळे मेंदूची वाढ होते, म्हणून शिक्षक आणि विद्यार्थी यांना नवीन आव्हानांना सामोरे जाण्यास प्रेरित करा, शिकण्याच्या रोमांचक संधी निर्माण करा.
- अपयश ही कायमची स्थिती नाही म्हणून विद्यार्थ्यांना अपयश स्वीकारण्यास प्रोत्साहित करा, अपयशातून शिका आणि आपले क्षितिज विस्तारित करा.
- शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात वृद्धीची मानसिकता विकसित करा.

> **“प्रतिभा जितकी महत्त्वाची, त्यांपेक्षा प्रयत्न दुप्पट महत्त्वाचे.”**
>
> **- डॉ. अँजेला ली डकवर्थ**

# अध्ययनसंदर्भात शालेय नेतृत्वाचा आदर्श नमुना

**निर्देशात्मक नेतृत्व :**

शालेय नेतृत्वाच्या भूमिकेबद्दल एक संकुचित समज आहे की, ज्यांच्या वागणुकीमुळे व कृतींमुळे कोणताही दृष्टिकोन नसलेल्या किंवा शिक्षक व्यावसायिक विकासाचा कोणताही उल्लेख नसलेल्या शाळेतील अध्यापनावर परिणाम झाला आहे.

**शिकण्यासाठी नेतृत्व :**

हा सर्वसमावेशक नमुना आहे. ज्यात नेतृत्व मूल्ये, शिक्षक व्यावसायिक विकास, शालेय संदर्भांची समज आणि संपर्क जाळे यांचे शाळेच्या परिवर्तनासाठी उत्तेजन महत्वाचे असते, 'अभ्यासक' असलेल्या भागधारकांवर भर दिला जातो.

**अध्यापनशास्त्रीय नेतृत्व :**

या अनुमानावर आधारित आहे की, शालेय नेतृत्व आणि शिक्षक यांना विद्यार्थ्यांच्या क्षमता निर्माण करण्यासाठी अध्यापनशास्त्रीय प्रक्रियेचे ज्ञान आणि सराव असतो. शालेय नेतृत्व हे शिक्षकांचे व्यावसायिक विकास सुलभ करतात, सकारात्मक शालेय संस्कृतीस उत्तेजन देतात आणि विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संधीचा सर्वोत्तम वापर करतात.

> **"नेतृत्व आणि अध्ययन हे एकमेकांपासून दूर करता येणार नाहीत."**
>
> **- जॉन एफ. केनेडी**

# अध्यापनशास्त्रीय नेतृत्व

अध्यापनशास्त्रीय नेतृत्व म्हणजे अध्यापनाच्या विविध पद्धती व्यवस्थित समजून घेऊन त्यांच्या मदतीने विद्यार्थिकेंद्रित शालेय संस्कृती निर्माण करण्यासाठी स्वत:ची योग्यता/क्षमता वाढवणे.

- विद्यार्थ्यांच्या क्षमता वाढविण्याचे लक्ष्य ठेवत नावीन्यपूर्ण अध्यापनशास्त्राचा वापर केंद्रस्थानी ठेवत शाळेसाठी दृष्टिकोन विकसित करते.
- शिक्षकांचा व्यावसायिक विकास सुलभ करते.
- शिक्षकांना चिंतनशील व्यावसायिक म्हणून विकसित करते; ज्यामुळे ते ज्ञानी शिक्षक म्हणून सरावात मग्न राहू शकतात.
- अध्ययनावर लक्ष केंद्रित करणाऱ्या सकारात्मक शालेय संस्कृतीस उत्तेजन देते.
- शिक्षक आणि विद्यार्थी यांचेसाठी अध्ययन संधीचा प्रभावी वापर करते.
- विद्यार्थ्यांच्या वैयक्तिकृत अध्ययनासाठी शिक्षकांसोबत अध्यापनशास्त्रीय नियोजन विकसित करते आणि त्याची अंमलबजावणी करते.



# शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी धोरणे

- सहकारी शिक्षकांमध्ये सहकार्यात्मक चर्चा घडवून आणणे.
- इतर शाळा तसेच वर्गभेटी देऊन निरीक्षण करणे.
- शिक्षक विकासासाठी विशेषतः व्यावसायिक विकासासाठी खास तयार केलेल्या शिक्षकांचे समूह, व्यावसायिक अध्ययन गट यांमध्ये सहभाग घेणे .
- व्यावसायिक गोष्टींमध्ये आवड असलेल्या विषयामध्ये वैयक्तिक किंवा सहयोगी संशोधन करणे.
- सदुपदेशन आणि प्रशिक्षण.
- चिंतनशील सरावाची अध्ययन तंत्रे.
- कृती संशोधन.
- परिषदा आणि चर्चासत्रे यात सहभाग आणि सादरीकरण.
- सुधारित अध्यापन पद्धतीसाठी विद्यार्थ्यांची अध्ययनविषयक माहिती वापरणे.
- संगणकीय क्षमता अद्ययावत करणे.

**शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी इतर कोणती धोरणे असावीत, असे तुम्हाला वाटते?**

# सामान्य अध्यापनशास्त्र अंमलबजावणीची नेतृत्व कृती

शालेय नेतृत्वाकडून आत्मसात आणि सराव झालेल्या नेतृत्व क्षमता या शिक्षकांसाठी पोषक क्षेत्र बनतात; ज्यामुळे ते प्रेरित होऊन विकास करू शकतात. यानंतर, सक्षम शालेय नेतृत्व विद्यार्थ्यांची भरभराट आणि त्यांचे सर्वोत्तम बनणे यासाठी प्रवाही अध्ययन संस्कृती निर्माण व्हावी म्हणून **ज्ञान, कौशल्ये, दृष्टिकोन** आणि मूल्यांचा आराखडा असलेले अनुकूल भांडार सातत्याने निर्माण करतात.

- **तुमच्या विद्यार्थ्यांनी कोणत्या क्षमता विकसित कराव्यात, असे तुम्हाला वाटते?**
- **शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या सरावासाठी कोणत्या प्रकारची मानसिकता असावी, असे तुम्हांला वाटते?**
- **धैर्यशीलता आणि चिकाटी यांचा सराव करण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थी यांना तुम्ही कसे प्रेरित कराल?**

PM SHRI शालेय नेतृत्वाच्या अनेक महत्त्वाच्या भूमिकांपैकी एक म्हणजे शैक्षणिक पर्यवेक्षण; ज्यात शाळेच्या कृतीत गुण आणि विषयांच्या घडामोडीत अध्यापनशास्त्रीय प्रक्रियांचे जवळून परीक्षण होते. ज्यावेळी अध्यापनशास्त्रीय प्रक्रिया विद्यार्थिकेंद्रित असते. सर्वांगीण विकासाच्या संधी जास्त असतात तेव्हा, विद्यार्थी त्यांच्या क्षमता पातळी आणि अध्ययन निष्पत्ती यांवर जलद प्रगती करण्याचे लक्ष्य असते. येथे, अध्यापनशास्त्रीय नेतृत्वासाठी पडताळणीचे कार्य करू शकणारी तालिका दिली आहे. ज्यात वर्गातील आणि वर्गाबाहेरील विविध व्यापक अध्यापनशास्त्राची अंमलबजावणी, शिक्षकांच्या संबंधित प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांकडून प्राप्त क्षमता आणि त्यांचे प्रदर्शन यांचा आढावा घेता येईल.

| अध्यापनशास्त्र | प्रक्रिया | विद्यार्थी कोणत्या क्षमता प्राप्त करतील? |
|---|---|---|
| सहभागास उत्तेजन | • मुक्त चर्चा.<br>• प्रश्न विचारणे.<br>• सहकारी गट.<br>• विषय आणि संकल्पना यांत सहसंबंध जोडणे.<br>• विद्यार्थ्यांच्या मतांना प्रोत्साहन.<br>• विद्यार्थीही आशयाचे निर्माते.<br>• चौकशी आधारित समूह अध्ययन. | • आत्मविश्वास.<br>• अभिव्यक्ती/स्पष्टीकरण.<br>• निर्मितीची स्वायत्तता.<br>• विचारप्रक्रियेतून जागरूकता. |
| व्यक्तिसापेक्ष अध्ययन | • ज्ञान आणि समस्या मांडणीत वैयक्तिक सहभाग<br>• भीतीविरहित अभिव्यक्ती.<br>• शिक्षकांशी संवाद<br>• स्वयंअध्ययनास प्रोत्साहन.<br>• विद्यार्थी प्रेरित.<br>• सर्जनशील अध्ययन कृतींची रचना.<br>• शाळाबाह्य जागांचा वापर. | • नावीन्य/आश्चर्य यांची जाणीव<br>• कुतूहल.<br>• शिकणे, अपयशी होणे व नंतर पुन्हा शिकणे याचे स्वातंत्र्य. |

| | | |
|---|---|---|
| प्रकल्प व समस्या आधारित (पर्यायी वेळापत्रक नेमले/ दिले जाऊ शकते.) | • वास्तव जीवनातील समस्या मांडणी व त्यावर सहकार्यातून उपाययोजना.<br>• अभ्यासक्रमविषयक उद्दिष्टांना बांधील प्रकल्प निष्पत्ती<br>• एक आणि एकच क्षेत्र किंवा स्रोताशी संबंधित नाही. | • पृच्छा व टीका<br>• चिकित्सक विचार<br>• तर्क/तार्किकता/विचारसरणी<br>• सादरीकरण कौशल्य आराखड्याची स्वायत्तता |
| सहकार्य आणि संप्रेषण | • चौकशीवर आधारित<br>• आराखड्यावर आधारित | • ई-मसुदा<br>• टीका करणे/टीका टिप्पणी<br>• प्रदर्शन/सादरीकरण |
| विद्यार्थी सहभाग आणि प्रेरणा | • विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करणे.<br>• सहभाग जतन करणे.<br>• विविध परिस्थितीत प्रोत्साहन आणि समावेशन<br>• आत्मविश्वासास प्रोत्साहन | • सामाजिक जबाबदारी<br>• संमिश्र सांस्कृतिक संवेदना<br>• अर्थ आणि हेतू<br>• भावनिक बुद्धिमत्ता |
| सर्जनशीलता व नावीन्यता वाढ | • सामाजिक प्रयत्न<br>• एकत्र कल्पनानिर्मिती | • कल्पनानिर्मिती<br>• नावीन्य/नवीनता<br>• सामाजिक जबाबदारी |

***Source:* <u>*https://unesdoc.unesco.org/ark:/48223/pf0000379707*</u>**

# शाळांमध्ये शिक्षण संस्कृती विकसित करणे



# शालेय नेतृत्व : सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास साधण्यासाठी नेतृत्व दिशा

राष्ट्रीय शालेय नेतृत्व केंद्र, **NIEPA** नेतृत्वाला शाळेच्या प्राचार्यांचा व्यावसायिक विकास आणि शिकणे, या दृष्टीने प्रवास सुरू करणारे नेतृत्वाच्या मार्गावरील शिकण्याचे मार्गक्रमण असे मानते. शालेय नेतृत्व त्यांच्या व्यावसायिक सरावात एक किंवा एकापेक्षा अधिक नेतृत्व मार्ग निवडू शकतात. त्यांपैकी पाच खालीलप्रमाणे :

- शाळा आणि भागधारक यांच्या संदर्भात ओळख जाणून घेणे.
- कसे करावे याचे ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करणे.
- स्वनिर्देशित अध्ययन
- सहकार्यांचे जाळे आणि व्यावसायिक अध्ययनाचे समूह
- नवीन पिढीचे नेतृत्व तयार करणे.




याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी, खालील संदर्भ वाचा.

*Source: http://ncsl.niepa.ac.in/document/module%201.pdf*

> एक चांगला नेता लोकांना त्यांच्यावर नेतृत्व करू देतो.
> एक महान नेता लोकांमधील नेतृत्वाचे नेतृत्व करतो.
>
> - एम. डी. अर्नोल्ड

# शालेय नेतृत्व विकास : सात अभ्यासक्रम क्षेत्रे

शालेय नेतृत्व विकासावर राष्ट्रीय आराखडा कार्यक्रम व अभ्यासक्रम आराखडा सात मुख्य क्षेत्रांस सुसज्ज करतो. (NCSL 2015). स्पष्ट परिभाषित उद्दिष्टे आणि आशय क्षेत्रे असलेली ही मुख्य क्षेत्रे शाळाप्रमुखांना संपूर्ण शाळा विकासासाठी आरंभ आणि नेतृत्व बदल याकरिता सुसज्ज करतात.




*Source: http://ncsl.niepa.ac.in/materials/english_national_pdcfsld.pdf*

# संदर्भ

**Dweck, Carol.S.2017. Mindset-Changing the way you think to fulfill your potential. The Random Publishing House, New York, U.S.**

**Duckworth, Angela. 2017. Grit- Why Passion and Resilience are the secrets to success. Penguin Random House, U.K.**

**NIEPA, National Centre for School Leadership. 2015. National Programme Design and Curriculum Framework on School Leadership Development. http://ncsl.niepa.ac.in/materials/english_national_pdcfsld.pdf**

**NIEPA, National Centre for School Leadership. 2022. Leadership Pathways to Continuous Professional Development. 2022. http://ncsl.niepa.ac.in/leadership-pathway.php**

**UNESCO.2021.Reimagining Our Futures Together- A New Social Contract for Education. https://unesdoc.unesco.org/ark:/48223/pf0000379707**

**स्व-मूल्यमापन करा.**

**चाचणीसाठी खालील लिंकवर क्लिक करा.**

***https://forms.gle/Ug6nGg3WpFg687k6A***

**चाचणी देण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.**

मुद्रक : रत्ना ग्राफिक्स, पुणे.